**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना इस्रायली संसदेचा 'स्पीकर ऑफ द नेसेट मेडल' हा सर्वोच्च सन्मान प्रदान

- राज्यसभेच्या ३७ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना निवडणूक आयोगाकडून जारी

- शालेय पुस्तकात न्यायालयीन यंत्रणेतल्या भ्रष्टाचाराबद्दल असलेल्या मजकुराबाबत सर्वोच्च न्यायालयाची एनसीईआरटीच्या संचालकांना कारणे दाखवा नोटीस

**आणि**

- टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान सामना रंगणार

**<><><><><>**

कोणत्याही प्रकारचा दहशतवाद हा जगातल्या शांततेसाठी धोकादायकच आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी भारत वचनबद्ध असून दहशतवादाविरोधात इस्रायलनं पुकारलेल्या लढ्यात भारत त्यांच्याबरोबर खंबीरपणे उभा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. ते इस्रायलच्या संसदेत बोलत होते. भारत-इस्रायल धोरणात्मक संबंध दृढ करण्यासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांना इस्रायली संसदेनं 'स्पीकर ऑफ द नेसेट मेडल' हा सर्वोच्च सन्मान देऊन गौरवण्यात आलं. हा सन्मान मिळवणारे ते पहिले भारतीय प्रधानमंत्री ठरले आहेत.

इस्रायलच्या संसदेत केलेल्या भाषणाच्या प्रारंभी प्रधानमंत्री मोदी यांनी सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित केल्याबद्दल आभार मानले. हा गौरव एखाद्या व्यक्तीचा नसून भारत आणि इस्रायल यांच्यातील चिरस्थायी मैत्रीचा आहे. दोन्ही राष्ट्रांना मार्गदर्शक ठरणाऱ्या सामायिक मूल्यांचे हे प्रतीक आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. प्रधानमंत्र्यांनी आपल्या भाषणात भारताच्या वेगवान आर्थिक प्रगतीवरही प्रकाश टाकला. जगातील पहिल्या तीन मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक होण्याच्या दिशेनं भारताची वाटचाल होत असल्याचं त्यांनी

सांगितलं. प्रधानमंत्री मोदी यांच्या भाषणाचे इस्रायल संसदेतील सदस्यांनी टाळ्या वाजवून कौतुक केलं.

तत्पूर्वी तेल अवीव इथं प्रधानमंत्री मोदी आणि इस्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेत्यान्यू यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. या बैठकीत उभय देशांतील सर्वांगीण संबंधांवर तसंच जलव्यवस्थापन, कृषी, तंत्रज्ञान आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांत सहकार्य वाढवण्यावर भर देण्यावर चर्चा झाली.

दरम्यान, आज प्रधानमंत्री मोदी जेरुसलेम इथल्या ‘यद वाशेम’ स्मारकाला भेट देणार आहेत. तिथं ते प्रार्थना सभेतही सहभागी होतील.  इस्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हर्झोग यांची ही प्रधानमंत्री भेट घेणार आहेत.

दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी इस्रायलमधील भारतीय वंशाच्या ज्यू समुदायातील सदस्यांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर ते मायदेशी परत येण्यासाठी निघतील.

**<><><><>**

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी उद्यापासून चार दिवसांच्या भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. प्रधानमंत्री कार्नी यांचा हा पहिलाच अधिकृत भारत दौरा असून ते उद्या मुंबईत येणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली. या दौऱ्यात ते उद्योगविषयक कार्यक्रमांत सहभागी होणार आहेत. भारत आणि कॅनडातले मुख्य कार्यकारी अधिकारी, उद्योग आणि वित्तीय तज्ज्ञ, नवोन्मेषक, शिक्षणतज्ज्ञ तसंच भारतातल्या कॅनेडियन पेन्शन फंडांच्या प्रतिनिधींशीही ते संवाद साधणार आहेत.

प्रधानमंत्री कार्नी १ मार्चला नवी दिल्लीला जाणार आहेत. त्यानंतर २ मार्चला ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर हैदराबाद हाऊसमध्ये प्रतिनिधीमंडळ स्तरावरच्या चर्चेत सहभागी होतील. या बैठकीत उभय देशांतल्या धोरणात्मक भागीदारीअंतर्गत विविध क्षेत्रांतील प्रगतीचा आढावा घेणार आहेत. व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, खनिजे, कृषी, शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेष तसंच द्विपक्षीय संबंध आणि सहकार्यावर चर्चा करतील. प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही दोन्ही नेते सविस्तर चर्चा करतील. यानंतर दोन्ही नेते भारत-कॅनडा सीईओ फोरममध्येही सहभागी होणार आहेत.

या दौऱ्यामुळे भारत आणि कॅनडा यांच्यातील द्विपक्षीय संबंधांना नवी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**<><><><><>**

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना निवडणूक आयोगाने आज जारी केली. यात महाराष्ट्रातल्या सात जागांचा समावेश आहे. या सदस्यांचा कार्यकाळ येत्या २ एप्रिलला संपत आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज ५ मार्चपर्यंत दाखल करता येतील. अर्जदारांची छाननी ६ मार्चला होईल. ९ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. निवडणूक लढवली गेली तर १६ मार्चला सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत मतदान घेतलं जाईल.

**<><><><><>**

नागरिक आणि बालकांच्या सुरक्षिततेचा विचार करुन समाजमाध्यमांनी आपल्या मंचावर येणाऱ्या आशयाबाबत दक्षता बाळगायला हवी असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्लीत एका परिषदेला संबोधित करत होते. प्रत्यक्ष व्यक्तीच्या अनुमतीशिवाय त्या व्यक्तीचा आवाज किंवा व्यक्तिमत्वाचा वापर समाजमाध्यमांनी करु नये. तसंच महसूल कमावताना आशय निर्मात्याला योग्य तो मोबदला दिला पाहिजे, असंही वैष्णव यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभेत आज पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला सुरुवात झाली. यंदा पुरवणी मागण्या अकरा हजार कोटींवर आल्या. काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शिवभोजन योजना अशा योजनांसाठी निधी मिळत नाही, जिल्हा परिषद शाळा बंद पडत आहेत, अनेक शाळांत शिक्षक नाहीत, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ट्रेनिंग सेंटर नाही अशा तक्रारींचा पाढा वाचला. या विभागांना तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली.

शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी जालना जिल्ह्यासाठी विविध योजनांसाठीचा निधी देण्याची मागणी चर्चेत केली. जिल्ह्यात १६५ खाटांचं रुग्णालय मंजूर झालं असून त्यासाठी आजपर्यंत निधी मिळाला नाही असं त्यांनी सांगितलं. स्टील उद्योगासाठी वीज बिलात अनुदान, ईपीएल धारकांचं दहा कोटी अनुदान, शिवभोजन योजनेसाठीचा तीन कोटी निधी

द्यावा अशी मागणी त्यांनी केली. जिल्ह्यातल्या सर्व तालुक्यांना निधीचं समान वितरण करावं अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

सारथी योजनेअंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३८८ विद्यार्थ्यांना ७ कोटी २४ लाख रुपये शिष्यवृत्तीची रक्कम वितरित झाली. शिष्यवृत्तीप्राप्त उर्वरित ३७९ विद्यार्थ्यांसाठीची ५ कोटी ९६ लाख रुपये शिष्यवृत्तीची रक्कम ३१ मार्च पर्यत वितरीत करावी अशा सूचना दिल्या आहेत असं सरकारकडून विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगण्यात आलं. जयंत पाटील, अभिजित पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. ही योजना पुढेही सुरू राहील असं सरकारनं स्पष्ट केलं.

<><><><>

महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून देशाच्या जीडीपीतला वाटा वाढत आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरच्या चर्चेला ते आज उत्तर देत होते. महाराष्ट्र तीस लाख कोटींचं जीएसटी संकलन करतो, देशाच्या जीएसटीतला वाटा चालू आर्थिक वर्षात १४ टक्क्याच्या आसपास राहील असं मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल हा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><>

एनसीईआरटी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या आठवीच्या पुस्तकामध्ये न्यायालयीन यंत्रणेतल्या भ्रष्टाचाराबद्दल असलेल्या मजकुरासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एनसीईआरटीच्या संचालकांना तसंच शालेय शिक्षण मंडळाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसंच, न्यायालयानं या पुस्तकावर सर्वंकष बंदी घालत पुस्तकाच्या सर्व मुद्रित प्रती जप्त करण्याचे आणि त्याच्या डिजिटल आवृत्त्या तात्काळ हटवण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांना या आदेशांचं तातडीनं पालन करण्याच्या सूचना दिल्या असून आदेशाचं उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईचा इशारा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. या प्रकरणी एनसीईआरटीने दिलगिरी व्यक्त न करता कृतीची भलावण केल्याबाबतही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे.

<><><><>

प्रेमभंग हे आत्महत्येला प्रवृत्त करण्यासाठीचं कारण होऊ शकत नाही असं महत्वपूर्ण मत दिल्ली उच्च न्यायालयानं नोंदवलं आहे. आत्महत्येला प्रवृत्त केल्याबाबतच्या गुन्ह्यातल्या व्यक्तीला जामीन मंजूर करताना न्यायालयानं हे म्हटलं आहे. या व्यक्तीच्या लग्नानंतर त्याच्या माजी प्रेयसीनं आत्महत्या केली होती. या आत्महत्येबाबत त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला होता. प्रेमभंग म्हणजे आत्महत्येशिवाय पर्याय नसणारी परिस्थिती नसल्याचं जामीन मंजूर करताना न्यायालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. सावरकरांनी देशाला गुलामगिरीच्या साखळ्यांपासून मुक्त करण्यासाठी आपलं जीवन समर्पित केलं, त्यांचं व्यक्तिमत्व आणि कार्य प्रत्येक पिढीला राष्ट्रसेवेसाठी प्रेरणा देत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट चा पहिल्या गटाच्या सामन्यांमध्ये आज भारत आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान सामना होणार आहे. चेन्नईत एमए चिदंबरम मैदानावर आज संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरु होईल. भारताला उपान्त्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी आजचा सामना तसंच येत्या रविवारचा वेस्ट इंडिजबरोबरचा सामना या दोन्हीमध्येही विजय मिळवणं आवश्यक आहे.

गट एकच्या दुसऱ्या सामन्यांमध्ये वेस्ट इंडिड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामधला सामना आज दुपारी ३ वाजता अहमदाबाद इथे नरेंद्र मोदी मैदानावर सुरु होईल.

//<><><><><>//